(सर्व कायदेशीर अथवा न्यायालयीन विवादासाठी या आदेशाचा इंग्रजी अनुवाद अधिग्राह्य धरण्यात येईल.)

वनजमिन-ठाणे

वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत कार्यकारी अभियंता, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, बांद्रा-कुर्ला कॉप्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई यांना मानकोली ते मोटागांव रस्त्यावर उल्हास खाडीवर पोहोच रस्त्यासह ९८० मीटर लांबीचा सहापदरी पूल बांधणेकरीता ०.५८ हेक्टर कांदळवन जमिन वळती करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन आदेश क्रमांकः एफएलडी-१२१७/प्र.क्र.२५९/फ-१०

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : २२/०७/२०१९

वाचा :-

१) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.डेस्क-१७/एनसी/२/आयडी-१२५०२/(४४)/७४९/२०१७-१८, दि. २८/०६/२०१७.

२) पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, क्षेत्रिय कार्यालय, पश्चिम-मध्य क्षेत्र, भारत सरकार, नागपूर यांचे पत्र क्र.एफ.नं.एफसी-१/एमएच-७८/२०१७-एनजीपी/३४४६, दि. २६/०३/२०१८.

३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.डेस्क-१७/एनसी/२/आयडी-१२५०२/(६१)/२१८१/२०१८-१९, दि. १६/०२/२०१९.

४) पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, क्षेत्रिय कार्यालय, पश्चिम-मध्य क्षेत्र, भारत सरकार, नागपूर यांचे पत्र क्र. एफ.नं.एफसी-१/एमएच-७८/२०१७-एनजीपी/५१९३, दि. १२/०४/२०१९.

५) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.डेस्क-१७/नोडल/आरएस-२/आयडी-१२५०२/(६१)/१५१/१९-२०, दि.०६/०५/२०१९.

६) रिट याचिका क्र. ८७/२००६ मधील नोटीस ऑफ मोशन (एल) नं.७८४/ २०१५ मध्ये मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक २२/११/२०१६ रोजी पारित केलेले आदेश.

आदेश :-

ज्याअर्थी, राज्य शासनाच्या दिनांक १०/०५/२००० रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झालेल्या प्राधिकारानुसार अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी कार्यकारी अभियंता, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, बांद्रा-कुर्ला कॉप्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेला वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत मानकोली ते मोटागांव रस्त्यावर उल्हास खाडीवर पोहोच रस्त्यासह ९८० मीटर लांबीचा सहापदरी पूल बांधणेकरीता ०.५८ हेक्टर

कांदळवन जमिन वळती करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनास उपरोक्त अ.क्र.१ येथील पत्रान्वये शिफारसीसह सादर केला होता;

आणि ज्याअर्थी, भारत सरकारने, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी वन (संवर्धन), अधिनियम, १९८० च्या कलम-२ खाली सादर केलेल्या सदर प्रस्तावास वरील अ.क्र.-२ येथील पत्रान्वये तत्वत: मंजूरी दिलेली आहे. ही मंजूरी भारत सरकारच्या दिनांक २६/०३/२०१८ रोजीच्या पत्रात नमूद केलेल्या अटींची पूर्तता प्रकल्प यंत्रणा करेल याच्या अधीन राहून प्रदान केली आहे;

आणि ज्याअर्थी, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी त्यांच्या वरील अ.क्र.-३ येथील पत्रान्वये तत्वत: मान्यता आदेशातील अटींचा पूर्तता अहवाल पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, क्षेत्रिय कार्यालय, पश्चिम-मध्य क्षेत्र, भारत सरकार, नागपूर यांना सादर केला होता;

आणि ज्याअर्थी, पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, क्षेत्रिय कार्यालय, पश्चिम-मध्य क्षेत्र, भारत सरकार, नागपूर यांनी ठाणे जिल्हयातील ०.५८ हेक्टर कांदळवन जमिन उपरोक्त प्रस्तावासाठी काही अटींसह वरील अ.क्र.-४ येथील पत्रान्वये वळती करण्यास अंतिम मंजूरी दिलेली आहे;

आणि ज्याअर्थी, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी त्यांच्या वरील अ.क्र.-५ येथील पत्रान्वये पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, क्षेत्रिय कार्यालय, पश्चिम-मध्य क्षेत्र, भारत सरकार, नागपूर यांच्या दिनांक २६/०३/२०१८ व दिनांक १२/०४/२०१९ रोजीच्या अनुक्रमे तत्वत: व अंतिम मान्यतेच्या पत्रांतील अटींची पूर्तता प्रकल्प यंत्रणेने केली असल्याचे कळविले आहे;

आणि ज्याअर्थी, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी त्यांच्या वरील अ.क्र.-६ येथील आदेशान्वये प्रकल्पाचे क्षेत्रात काम सुरु करण्याची परवानगी दिली आहे;

म्हणून आता महाराष्ट्र शासन याद्वारे असे निर्देश देत आहे की, प्रकल्प प्राधिकरण म्हणजेच कार्यकारी अभियंता, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, बांद्रा-कुर्ला कॉप्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई यांना, वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत मानकोली ते मोटागांव रस्त्यावर उल्हास खाडीवर पोहोच रस्त्यासह ९८० मीटर लांबीचा सहापदरी पूल बांधणेकरीता अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या पत्रासह जोडलेल्या प्रकल्प प्रस्तावात अधिक तपशीलात नमूद केलेली आणि खाली दिलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेली ज्यामध्ये, कांदळवन जमिन समाविष्ट आहे, अशी एकूण ०.५८ हेक्टर वनजमिन या प्रस्तावासाठी वळती करण्यात यावी. हे वळतीकरण भारत सरकारच्या दिनांक २६/०३/२०१८ व दिनांक १२/०४/२०१९ रोजीच्या पत्रांतील अटी व शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन राहून तसेच खालील अटींच्या पूर्ततेनंतर पूर्ण करण्यात यावे.

१. वर नमुद केलेल्या भारत सरकारच्या तत्वत: मान्यता व अंतिम मान्यतेच्या पत्रातील विहित केलेल्या सर्व अटींचे प्रकल्प यंत्रणा अनुपालन करेल. प्रकल्प यंत्रणा सर्व अटींचे तंतोतंत अनुपालन करेल याची मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे/ विभागीय वन अधिकारी,

मुंबई कांदळवन संधारण कक्ष, मुंबई हे खात्री करतील. मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे/ विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण कक्ष, मुंबई याबाबतचा अहवाल वेळोवेळी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना सादर करतील.

२. वन (संवर्धन) अधिनियम, १९८० व त्याअंतर्गत केलेले नियम आणि मार्गदर्शक सूचना व या आदेशातील अटींपैकी कोणत्याही अटींचे अनुपालन न करणे हे वन (संवर्धन), १९८० चा भंग ठरेल आणि त्याप्रमाणे याबाबत वैधानिक कारवाई करण्यात येईल.

३. उपरोक्त अटींपैकी कोणत्याही अटींचे अनुपालन न केल्यास (non-compliance) संबंधित उपवनसंरक्षक/ विभागीय वन अधिकारी, वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत दिनांक २५/१०/१९९२ रोजी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनातील कलम १.९ नुसार अहवाल राज्य शासनामार्फत अतिरिक्त महासंचालक (वने), पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, पश्चिम-मध्य क्षेत्र, भारत सरकार, नागपूर यांना सादर करतील.

अनुसूची

गावाचे नाव	तालुका	जिल्हा	सर्व्हे नंबर	वैधानिक दर्जा	क्षेत्रफळ (हेक्टर मध्ये)
सुरई	कल्याण	ठाणे	६२ Pt	कांदळवन	०.५८

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७२२१४४९२५८११९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VIRENDRA RAMBAHAL TIWARI

Digitally signed by VIRENDRA RAMBAHAL TIWARI
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec375cd62a646a64986631086810, postalCode=400032, street=R AND F D,4TH FLOOR,MANTRALAYA,MUMBAI, ou=FOREST DEPARTMENT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=VIRENDRA RAMBAHAL TIWARI
Date: 2019.07.22 14:59:45 +05'30'

(वीरेन्द्र तिवारी)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)

प्रत- टप्पा-१ व टप्पा-२ च्या मंजुरी आदेशासह वरील आदेश आपल्या वेबसाईटवर अपलोड करण्याच्या विनंतीसह :

१. सचिव, पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.

२. अतिरिक्त महासंचालक (वने), पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, पश्चिम-मध्य क्षेत्र, भारत सरकार, नागपूर.

प्रत :-

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कॅम्पा), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
७. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
८. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कांदळवन), कांदळवन कक्ष, मुंबई
९. मुख्य वनसंरक्षक (वन संवर्धन), नागपूर.
१०. मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे.
११. जिल्हाधिकारी, ठाणे.
१२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे.
१३. उपवनसंरक्षक, ठाणे.
१४. विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण कक्ष, मुंबई.
१५. कार्यकारी अभियंता, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, बांद्रा-कुर्ला कॉप्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई.
१६. निवडनस्ती (कार्यासन फ-१०).

२. जिल्हाधिकारी, ठाणे; मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे; उपवनसंरक्षक, ठाणे व विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण कक्ष, मुंबई यांना निर्देशित करण्यात येते की, वरील आदेशाची प्रत स्थानिक संस्था, पंचायत, नगरपालिका, नगरपरिषद आणि संबंधित शासकीय कार्यालयांचे प्रमुख यांना पाठविण्यात यावी. तसेच त्यांनी वरील आदेश त्यांच्या कार्यालयातील सूचना फलकावर तसेच वरील कार्यालय प्रमुखांच्या सूचना फलकावर सर्वसामान्य जनतेच्या माहितीसाठी प्रदर्शिले जातील याची खात्री करावी.

३. कार्यकारी अभियंता, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, बांद्रा-कुर्ला कॉप्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई यांना निर्देशित करण्यात येते की, वन मंजुऱ्यांचे सर्व आदेश एक स्थानिक भाषेतील व एक इंग्रजी भाषेतील प्रसिध्द अशा दोन दैनिक वृत्तपत्रात प्रसारित करावेत.

४. स्थानिक स्वराज्य संस्था, पंचायत, नगरपालिका, नगरपरिषद आणि संबंधित शासकीय कार्यालयांचे प्रमुख यांना निर्देशित करण्यात येते की, आदेशांची प्रत मिळाल्यापासून ३० दिवसापर्यंत सदर आदेश सूचना फलकावर प्रदर्शित करावेत.

<u>Forest Land- Thane</u>
Diversion of 0.58 Ha. of Mangrove Forest land under Forest (Conservation) Act, 1980 in favour of Executive Engineer, Mumbai Metropolitan Region Development Authority, Bandra-Kurla Complex, Bandra (East), Mumbai for construction of six lane bridge across Ulhas Creek having length of 980 meter on proposed Mankoli Motagaon Road.

Government of Maharashtra

Revenue and Forest Department

Government Order No. FLD-1217/ C.R.-259/ F-10

Mantralaya, Mumbai-400 032.

Date: 22/07/2019

<u>Read:</u>-

1) Letter from Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur, No.Desk-17/NC/II/I.D.-12502/(44)/749/2017-18, dated 28/06/2017.
2) Letter from Ministry of Environment, Forests & Climate Change, Regional Office, West-Central Zone, Government of India, Nagpur F.No.FC-I/MH-78/2017-NGP/ 3446, dated 26/03/2018.
3) Letter from Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur, No.Desk-17/NC/II/I.D.-12502/(61)/2181/2018-19, dated 16/02/2019.
4) Letter from Ministry of Environment, Forests & Climate Change, Regional Office, West-Central Zone, Government of India, Nagpur F.No.FC-I/MH-78/2017-NGP/ 5193, dated 12/04/2019.
5) Letter from Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur, No.Desk-17/Nodal/RS-II/I.D.-12502/(61)/151/19-20, dated 06/05/2019.
6) Hon'ble High Court of Bombay, Order dated 22/11/2016 in Notice of Motion (L) No.784 of 2015 in Writ Petition No.87 of 2006.

Order:-

Whereas, in exercise of power delegated by Government of Maharashtra, vide letter dated 10/05/2000, Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur, vide his letter referred at serial number 1 above has recommended a proposal to Government of India, which has been received from the Executive Engineer, Mumbai Metropolitan Region Development Authority, Bandra-Kurla Complex, Bandra (East), Mumbai for diversion of 0.58 Ha. of Mangrove Forest Land under Forest (Conservation) Act, 1980 for construction of six lane bridge across Ulhas Creek having length of 980 meter on proposed Mankoli Motagaon Road.

AND whereas, Government of India after due consideration, vide its letter referred at serial number 2 above granted in-principle approval to above proposal submitted by Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur for diversion of forest land under section 2 of Forest (Conservation) Act, 1980. The said approval is subject to fulfillment of certain conditions by the User Agency mentioned in its letter dated 26/03/2018;

AND whereas, Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur, vide its letter referred at serial number 3 above has submitted compliance of those conditions to the Ministry of Environment, Forests & Climate Change, Regional Office, West-Central Zone, Government of India, Nagpur;

AND whereas, Ministry of Environment, Forests & Climate Change, Regional Office, West-Central Zone, Government of India, Nagpur, vide letter referred at serial number 4 above has accorded formal approval under section 2 of Forest (Conservation) Act, 1980, for the diversion of 0.58 Ha. of Mangrove Forest land for construction of six lane bridge across Ulhas Creek having length of 980 meter on proposed Mankoli Motagaon Road;

AND whereas, the Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur, vide letter referred at serial number 5 above has conveyed that, User agency has complied with all the conditions stipulated in Ministry of Environment, Forests & Climate Change, Regional Office, West-Central Zone, Government of India, Nagpur's in-principle & final approval letter dated 26/03/2018 & dated 12/04/2019 respectively;

AND whereas, Hon'ble High Court of Bombay, vide its order referred at serial number 6 above has granted permission to carry out the work under the project;

NOW, therefore, Government of Maharashtra hereby directs that the forest land area of 0.58 Ha. consisting of Mangrove land more specifically described in the proposal submitted, vide letter mentioned at serial number 1 herein above from Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur and as per details given in the Schedule given below, be diverted to the User Agency, i. e. Executive Engineer, Mumbai Metropolitan Region Development Authority, Bandra-Kurla Complex, Bandra (East), Mumbai for construction six lane bridge across Ulhas Creek having length of 980 meter on proposed Mankoli Motagaon Road. The diversion shall be effected subject to the terms and conditions mentioned in the letters dated 26/03/2018 and dated 12/04/2019 of Government of India. This approval for diversion of forest land is also subject to compliance of following conditions by the User Agency-

1. The User Agency shall comply with all the conditions stipulated in the in-principle and final approval letters of Government of India, referred above. The Chief Conservator of Forest (Territorial), Thane/ Divisional Forest Officer, Mumbai Mangrove Conservation Unit, Mumbai shall ensure the strict compliance of the conditions by the Project

Authority. CCF (T) will furnish the report in this regard to Additional Principal Chief Conservator of Forests and Nodal Officer, Maharashtra State, Nagpur from time to time.

2. Non-compliance of any of the conditions mentioned in this order and Rules and Guidelines made / issued under Forest (Conservation) Act, 1980, shall amount to violation of Forest (Conservation) Act, 1980 and action would be taken accordingly.
3. In case of non-compliance of any of the above conditions, the concerned Deputy Conservator of Forests/ Divisional Forest Officer shall report through the State Govt. to Additional Director General of Forests (Central), Ministry of Environment, Forests & Climate Change, Regional Office, West-Central Zone, Government of India, Nagpur as per procedure laid sown in the clause 1.9 of guidelines on 25/10/1992 under the Forest (Conservation) Act, 1980.

SCHEDULE

Village Name	Tehsil	District	Survey Number	Legal Status	Area (in Hectare)
Surai	**Kalyan**	**Thane**	**62 Pt**	**Mangrove Forest**	**0.58**

This Government Order of Maharashtra Government is available on its website www.maharashtra.gov.in. Reference no. for this is 201907221449258119. This order has been signed digitally.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

VIRENDRA
RAMBAHAL TIWARI

Digitally signed by VIRENDRA RAMBAHAL TIWARI
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec375cd62a646a6498663
1086810, postalCode=400032, street=R AND F D,4TH
FLOOR,MANTRALAYA,MUMBAI, ou=FOREST DEPARTMENT, o=GOVERNMENT
OF MAHARASHTRA, cn=VIRENDRA RAMBAHAL TIWARI
Date: 2019.07.22 15:00:32 +05'30'

(Virendra Tiwari)

Additional Principal Chief Conservator of Forests
(Mantralaya)

Copy forwarded with request to upload this order on their website along with the Stage-I and Stage-II clearances to:

1. Secretary, Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, New Delhi.
2. Additional Director General of Forests (Central), Ministry of Environment, Forests & Climate Change, Regional Office, West-Central Zone, Government of India, Nagpur.

Copy to:

1. Principal Chief Conservator of Forests (HoFF), Maharashtra State, Nagpur
2. Principal Chief Conservator of Forests (Wildlife), Maharashtra State, Nagpur

3. Principal Secretary, Tribal Development Department, Mantralaya, Mumbai
4. Secretary, Public Works Division, Mantralaya, Mumbai
5. Additional Principal Chief Conservator of Forests and Nodal Officer, Maharashtra State, Nagpur.
6. Additional Principal Chief Conservator of Forests (CAMPA), Maharashtra State, Nagpur.
7. Additional Principal Chief Conservator of Forests (Conservation), Maharashtra State, Nagpur.
8. Additional Principal Chief Conservator of Forests (Mangrove), Mangrove Cell, Mumbai.
9. Chief Conservator of Forests (Forest Conservation), Nagpur.
10. Chief Conservator of Forests (Territorial), Thane.
11. Collector, Thane.
12. Chief Executive Officer, Zilla Parishad, Thane.
13. Deputy Conservator of Forests, Thane.
14. Divisional Forest Officer, Mumbai Mangrove Conservation Unit, Mumbai.
15. Executive Engineer, Mumbai Metropolitan Region Development Authority, Bandra-Kurla Complex, Bandra (East), Mumbai.
16. Select File, Desk F-10.

2. Collector, Thane; Chief Executive Officer, Zilla Parishad, Thane; Deputy Conservator of Forests, Thane & Divisional Forest Officer, Mumbai Mangrove Conservation Unit, Mumbai are hereby directed to forward the copy of this order to concerned Heads of Local Bodies, Panchayats, Municipal Bodies in addition to the relevant offices of the Government and they shall also ensure the display of this order on their notice board as well as on the notice board of local self government bodies for the information of general public.

3. Executive Engineer, Mumbai Metropolitan Region Development Authority, Bandra-Kurla Complex, Bandra (East), Mumbai is hereby directed that he should publish the entire order of forest clearances granted in verbatim along with the conditions and safe guards imposed by the Central Government in Stage-I & Stage-II forest clearance in two widely circulated daily newspapers, one in vernacular language and other in English language.

4. Heads of Local Bodies, Panchayats and Municipal Bodies in addition to the relevant offices of the Government are hereby directed to display the same on their notice board for 30 days from the date of receipt for the information of general public.